3432
जा क्र मसके/प्रअपां/ठेका/ /९८६/२०२२
मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली
दिनांक : १८/११/२०२२ 29 NOV 2022

प्रती,

मा.व्यवस्थापक
कृषिज्ञान व्यवस्थापन कक्ष,
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली

विषय : पांगारी विभागाअंतर्गत कंत्राटी पध्दतीने सुरक्षा रक्षक नेमण्याच्या जाहीरातीस विद्यापीठ संकेतस्थळावर (www. dbskkv.org) प्रसिध्दी देणे बाबत... .

महाशय,

उपरोक्त विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, या केंद्रास पांगारी विभागातील आंबा बागेची सुरक्षा करणेचा ठेका दयावयाचा आहे. तरी कंत्राटी पध्दतीने सुरक्षा रक्षक नेमण्याच्या जाहीराती बाबतची प्रसिध्दी विद्यापीठ संकेतस्थळावर (www. dbskkv.org) करणेस विनंती आहे. सोबत प्रसिध्दी नमूना जोडणेत येत आहे.

आपला विश्वासू,

सोबत : वरील प्रमाणे.

संचालक,
मध्यवर्ती संशोधन केंद, वाकवली,
ता. दापोली, जि. रत्नागिरी

# सुरक्षा रक्षक ठेक्याबाबतच्या सर्वसाधारण अटी व शर्ती

१ ठेकेदाराने ठेका सादर करण्यापूर्वी प्रत्यक्ष प्रक्षेत्रावर कामाचे स्वरुप पाहूनच दरपत्रकामध्ये / दरपत्रक / निविदेमध्ये दर सादर करावेत.

२ ठेका मंजूरी आदेश प्राप्त होताच मंजूरी पत्रामध्ये दिलेल्या दिनांकापासून निम्नस्वाक्षरीकार / विभाग प्रमुख / प्रक्षेत्र अभिक्षक आणि सुरक्षा अधिकारी यांनी दिलेल्या सुचनांनुसार व त्यांचे देखरेखीखाली काम करावयाचे आहे.

३ ठेकेदाराने नेमलेल्या मजूरांना श्रम व ,रोजगार मंत्रालय नवी दिल्ली यांचा **F.NO. 1/13(1)/2017-LS-11** दिनांक १७.३.२०१७ च्या अनुषंगाने शासनाच्या किमान वेतन दरानुसार वेतन देण्यात येते, असे प्रमाणपत्र ठेक्याचे देयक कार्यालयास सादर करतेवेळी देयकासोबत सादर करणे आवश्यक आहे. प्रमाणपत्र देयकासोबत नसल्यास देयकाची अदायगी करण्यात येणार नाही.

४ कामाच्या मजुरीची अदायगी पंधरा दिवसानंतर अथवा महिना पूर्ण झाल्यावर करण्यात येईल . संबंधित देयक सादर करताना विभाग प्रमुख / प्रक्षेत्र प्रमुख / प्रक्षेत्र अभिक्षक यांचेकडील सुरक्षा कामे वेळेत पूर्ण केलेबाबतचा दाखला देयकासोबत जोडणे बंधनकारक राहील.

ठेका अपुर्ण सोडल्यास ठेक्याच्या बीलाची अदायगी केली जाणार नाही व सदर कामाचा अनुभव पुढील ठेक्याच्यावेळी गृहीत धरला जाणार नाही. तसेच संबंधित ठेकेदाराचे दरपत्रक / निविदा पुढील ठेक्याच्यावेळी ग्राह्य धरले जाणार नाही.

प्रक्षेत्रावर दिलेल्या सुरक्षा संबंधी सुचनेनुसार करावयाची कामे विभागाच्या सोयी व गरजेनुसार ठेकेदाराने करणे बंधनकारक असेल, सुचनांचा अवमान केल्यास ठेका त्वरीत बंद केला जाईल आणि त्याबाबत ठेकेदाराच्या कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

ठेकेदाराकडे पॅनकार्ड व बॅंक खाते असणे बंधनकारक आहे. ठेकेदाराच्या देयकाची अदायगी सुरक्षा रक्षकांच्या बॅंक खाती **N.E.F.T./R.T.G.S.** धनाकर्षाव्दारे करण्यात येईल.

ठेकेदाराने कामावर ठेवलेल्या कामगारांना अपघात / सर्पदंश / विंचूदंश झाल्या संबंधित कामगारावर योग्य ते उपचार करण्याची सर्वस्वी जबाबदारी ठेकेदाराची राहील. त्यासाठी आलेल्या खर्चाची अदायगी या कार्यालयाव्दारे करण्यात येणार नाही.

कामाच्या कालावधीत ठेकेदार अथवा त्याच्या सुरक्षा रक्षकांकडून प्रक्षेत्राच्या मालमत्तेचे नुकसान झाल्यास अथवा प्रक्षेत्रावर चोरी झाल्यास त्याची वसुली ठेकेदाराच्या देयकामधून संबंधित नुकसानीची किंमत वसुल करण्यात येईल आणि त्याबाबत ठेकेदारावर कायदेशिर कार्यवाही करण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांना असेल.

ठेकेदारामार्फत पुरविण्यात आलेल्या सेवा सुविधा तसेच त्यांच्या कार्यपध्दतीचा आढावा कार्यालयामार्फत वेळोवेळी घेण्यात येईल. कार्यालयाने दिलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करणे ठेकेदारास बंधनकारक आहे. तसे न केल्यास ठेकेदारास देण्यात आलेल्या ठेका कोणत्याही वेळी रद्द करण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांनी राखून ठेवला आहे.

सर्वोच्च न्यायालयाने निर्धारीत केलेल्या याचिका क्रमांक SLP-5443/90 नुसार ठेकेदारास किंवा ठेकेदाराने नेमलेल्या मजूरास / इसमास ठेका कालावधीमध्ये / ठेका कालवधी नंतर विद्यापीठ / शासकीय सेवेत कायम स्वरुपी नोकरी मिळण्यास अधिकार राहणार नाही व तसा दावला देण्यात येणार नाही.

१२ ज्या कंपनीस/संस्थेस/व्यक्तीस ठेका देण्यात येईल त्यांनी उपरोक्त अटी व शर्ती मान्य असलेबाबतचा करार लिखित स्वरूपात करणे बंधनकारक राहील. कंपनी/संस्थेतर्फे/ठेकेदारामार्फत कामावर ठेवलेल्या कर्मचाऱ्यांच्या ठेवलेले कोणतेही उत्तरदायित्व शासनावर किंवा विद्यापीठावर असणार नाही.

१३ शासन निर्णयानुसार **पध्दतीप्रमाणे** ठेकेदाराचे देयकातून **आयकर** आणि GST **कपात करणेत येईल.**

१४ सुरक्षा रक्षकासाठी आवश्यक असलेला गणवेष, गमबूट,विजेरी,शिट्टी,काठी आदी आत्यावश्यक वस्तुंचा पुरवठा करण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील.

१५ सुरक्षा रक्षक कर्तव्यावर असतेवेळी कोणत्याही प्रकारचे गैरवर्तन घडल्यास अथवा मद्यपान केलेले तसेच झोपलेले आढळल्यास संबंधीतावर कार्यवाही करण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील. तसेच दैनंदिन सुरक्षा रक्षकांच्या कर्तव्यसेवा ठेकेदाराने वेळी अवेळी येऊन तपासावयाच्या आहेत. तशा नोंदी या विभागाने पुरविलेल्या रजिस्टरवर करावयाच्या आहेत.

१६ पक्षेत्रावरील सुरक्षा रक्षकांच्या दैनंदीन कर्तव्याचे ठिकाणाचे नियोजन हे पक्षेत्राच्या अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली करावे लागेल. पक्षेत्रावरील सुरक्षा रक्षकांच्या कर्तव्याचे ठिकाण सतत बदलत ठेवावयाचे आहे.

१७ ज्या ठेकेदारास सुरक्षा रक्षक पुरवठयाचा ठेका मंजुर होईल त्याठेकेदाराने सुरक्षा अनामत म्हणून एकुण **होणाऱ्या ठेका रकमेच्या 5% रकमेचा धनादेश "डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापिठ"** या नांवे काढून कार्यालयात जमा करावयाचा आहे. ठेका कालावधी समाप्त होताच सदरची सुरक्षा अनामत रक्कम ठेकेदारास परत करण्यात येईल.

१८. सुरक्षा रक्षक कर्तव्यावर असतेवेळी आपल्या ताब्यातील पक्षेत्र सोडून कोठेही बाहेर आढळता कामा नये.

१९. सुरक्षा रक्षक पुरवठयाचे काम अर्धवट सोडल्यास केलेल्या कामाचे देयक कार्यालयाकडून मिळणार नाही.

२०. किमान वेतन अधिनियम १९४८ उद्योग उर्जा व कामगार विभाग मंत्रालय मुंबई दि. २४.०७.२०१९.

२१ महागाइ भत्ता कामगार आयुक्त यांचे मुंबई दि.०५.०२.२०२१.

२२ कर्मचारी राज्य विमा निगम श्रम एवं रोजगार मंत्रालय भारत सरकार दि.२२.०७.२०१६.

२३ कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटन कायदा १९५२

२४ ठेका मंजुर होताच पाच दिवसांचे आत ठेकेदाराने रू.१०० मात्र चे स्टॅम्प पेपरवर अटी शर्ती मान्य असल्याच करारनामा लिहून देणे आवश्यक आहे.

२५ ठेकेदारामार्फत दरपत्रकात नमूद करण्यात आलेल्या दराच्या रकमेवर 1% (EMD) अनामत रक्क धनादेशव्दारे बंद लिफाफ्यामध्ये दरपत्रकासोबत जोडणे बंधणकारक राहील, 1% (EMD) अनामत रकमेच धनादेश जोडलेला नसेल तर दरपत्रक विचारात घेतले जाणार नाही.

२६ **जमा करण्यात आलेली 1% (EMD) अनामत रक्कम ठेका मंजुर होऊन, ठेका न स्विकारल्यास ज करण्यात येईल.**

२७ प्रक्षेत्रावरील कामाचे स्वरूप पाहून सुरक्षा रक्षक कमी अथवा जास्त ठेवण्याचा अधिकार राखून ठेवण्य ठेवण्यात आला आहे.

संचालक,
मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली.

जा क्र मसंके/प्रअपां/सु.र.ठेका/४६५/3433/२०२२
मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली
दिनांक : १८.११.२०२२ 29 NOV 2022

प्रति,

पत्ते मागिल प्रमाणे.

## जाहीर नोटीस

मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली अंतर्गत पांगारी येथील प्रक्षेत्रावर खालिल प्रमाणे कामे कंत्राटी पध्दतीने (ठेका) करावयाची आहेत. त्यासाठी दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

| अ क्र | कामाचा तपशिल | आवश्यक सुरक्षा रक्षक |
|---|---|---|
| १ | पांगारी विभाग 172 हे. प्रक्षेत्रा वरील मालमत्तेचे संरक्षण करणे.<br>(दि.01.04.2023 ते 15.06.2023 या कालावधीसाठी गरजेनुसार प्रती दिन 16 सुरक्षा रक्षक प्रक्षेत्रावर पहारा करणेसाठी आवश्यक आहेत.) | 16 |

उपरोक्त प्रमाणे प्रक्षेत्रावर पहारा करण्याचे टेका पध्दतीने करावयाचे आहे. कामाच्या अटी व शर्ती इत्यादी माहिती तसेच भरून दयावयाचे संमत्तीपत्र आणि दरपत्रक नमूना या कार्यालयात कार्यालयीन कामाच्या दिवशी व कार्यालयीन वेळेत उपलब्ध होईल. कंत्राटी कामाचे दरपत्रकामध्ये प्रती दिन प्रती सुरक्षा रक्षक मजुरी दराचा स्पष्टपणे उल्लेख करावा. दरपत्रक या कार्यालयाने तयार केलेल्या नमूना पत्रामध्येच भरून द्यावयाचे आहे. आपले दरपत्रक आणि संमतीपत्र या कार्यालयात दिनांक **29.12.2022** पर्यंत किंवा त्यापुर्वी पोहोचेल असे पाठवावे. विहीत दिनांकानंतर प्राप्त होणाऱ्या दरपत्रकांचा विचार करण्यात येणार नाही. लखोटयावर **"पांगारी विभागाअंतर्गत कंत्राटी सुरक्षा रक्षक काम"** असा उल्लेख करावा, लिफाफा मोहोरबंद करून मा. संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली (पांगारी विभाग) यांचे नावे पाठवावा. पोस्टाव्दारे होणाऱ्या विलंबास हे कार्यालय जबाबदार असणार नाही. दरपत्रक स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांचा राहील. दरपत्रकाच्या अटी व शर्ती सोबत जोडण्यात येत असून त्या ठेकेदारास बंधनकारक असतील. सदर अटी व शर्ती मान्य असल्यास दरपत्रक सादरीकरणाचे वेळी मान्यतेबाबत स्वाक्षरी करून दरपत्रकासोबत जोडण्यात याव्यात.

18/11/2022

संचालक,
मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली.